# ऋणनिर्देश

"कोल्हापूर शहरातील वडार समाजातील श्रमजीवी कामगारांचा अभ्यास" या विषयावरील एम.फिल. पदवीसाठी लिहिलेला लघु-शोधनिबंध अनेकांच्या प्रेरणा, मार्गदर्शन आणि सहकार्य यामुळे पूर्ण करता आला. यासाठी मला अनेकांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले त्या सर्वांचे योग्य ते ऋणनिर्देश करणे आणि त्यांच्याबद्दल आदर बाळगणे हे माझे कर्तव्य आहे.

या विषयावर लघुशोधनिबंध लिहित असताना विषयाच्या निवडीपासून अखेरपर्यंत माझे आदरणीय गुरूवर्य प्रा.डॉ.आर.बी.पाटील सर यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. त्यांचा विषयातील व्यासंग, संशोधनातील शिस्त, प्रदीर्घ अनुभव आणि अखंड उत्साह मला सतत प्रेरणादायी ठरला त्यांच्या अचूक, प्रेमळ मार्गदर्शनामुळेच मला हे संशोधनाचे कार्य पूर्ण करता आले. याबद्दल प्रा.डॉ.आर.बी.पाटील सर यांचे आभार मानण्यापेक्षा आयुष्यभर त्यांच्या ऋणात राहणे मी पसंत करीन.

संशोधन कालावधीत समाजशास्त्र विभागातील प्रा.डॉ.एम.ए. साळुंखे, प्रा.डॉ.जे.बी.आंबेकर, प्रा.डॉ.आर.एन.साळवे, वरिष्ठ अधिव्याख्याता डी श्रीकांत, अधिव्याख्याता बी.एन.केंद्रे, डॉ.प्रतिभा देसाई यांचेही मला वेळोवेळी बहुमोल असे मार्गदर्शन लाभले त्याप्रती मी कृतज्ञता व्यक्त करते.

माझे गुरूवर्य डॉ.रमेश जाधव सर, डॉ.सौ.अर्चना जगतकर यांचे मला महाविद्यालयीन जीवनापासून मार्गदर्शन लाभले त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. प्रा.डॉ.बी.एस.घाटगे, सतीश पवार, श्री.प्रताप साळुंखे, जनार्दन पवार यांनी मला संशोधन कामात वेळोवेळ सहकार्य केल्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

समाजशास्त्र विभागाचे कर्मचारी श्री.एस.बी.सुतार, चव्हाण मामा यांची मला मदत झाली. त्यांची ही मी आभारी आहे.

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

संशोधनाचा आवश्यक असलेला भाग वडार समाजातील श्रमजीवी कामगार, वडार समाजाचे कार्यकर्ते नगरसेवक याचबरोबर बॅ. बाळासाहेब खर्डेकर व करवीर वाचनालय येथून मिळवलेली ग्रंथसंग्रह अत्यंत महत्त्वाची ठरली त्यामुळे माझे काम अधिक सोपे झाले. या ग्रंथालयातील ग्रंथपाल व कर्मचारी वर्गाची मी अत्यंत ऋणी आहे. तसेच विद्यापीठातील इंटरनेट विभाग येथील कर्मचारी वर्गाची संशोधन कामात मदत मिळाली त्यांचे मन:पूर्वक आभार मानते.

ज्यांच्या त्याग व आशीर्वादाच्या जोरावर मला शिक्षणाची अनमोल अशी संधी प्राप्त झाली ते माझे आई-वडिल, दीदी, भाऊजी, भाऊ, मामा, मावशी, आजी-आजोबा, आत्या, तात्या यांच्या ऋणातच राहणे मी पसंत करेन.

सदरचा लघुशोध निबंध पूर्ण करण्यात मित्र मैत्रिणी परिवारामध्ये अखिलेश, अविनाश कांबळे, विशाल कुरणे, संदिप पाटील, रमजान सय्यद, अशिष सामंत, सुदर्शन सगट, गोविंद अंबी, मनाली शेटे, उज्वला पाटील, सारिका खाडे सोनाली सामंत, जयश्री कांबळे, वैशाली माने, सुप्रिया आणि इतर सर्वांचेही मला सहकार्य मिळाले याबद्दल त्यांचेही मन:पूर्वक आभार मानते.

वेळेत व बिनचूक टंकलेखन केल्याबद्दल अविज् कंम्प्युटर्स, ॲन्ड झेरॉक्स, सम्राटनगर, कोल्हापूर यांचेही मी मन:पूर्वक आभार मानते.

सदरचा लघुशोधनिबंध पूर्ण करण्यासाठी ज्यांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य व प्रेरणा मिळाली त्या सर्वांची मी अत्यंत ऋणी आहे.

दिनांक

स्थळ : कोल्हापूर

संशोधिका

दिपाली तुकाराम सामंत